# होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र

(टाटा मूलभूत संशोधन संस्था)

वि. ना. पुरव मार्ग, मानखुर्द, मुंबई ४०००८८

**खगोलशास्त्र शिक्षण उपक्रम**

## गृहपाठ - ६: चंद्र

डिसेंबर २००७

**नाव:** **इयत्ता ८ वी.**

**शाळेचे नाव:** **दिनांक**:

तुम्ही केलेल्या निरीक्षणांवरून सांगा:

१) रात्रभरात चंद्राचा आकार बदलला का?

२) बदलला असेल तर काय बदल झाला?

३) रात्रभरात चंद्राची जागा बदलली का?

४) बदलली असेल तर कशी बदलत गेली?

५) रात्रभरात चंद्राचा रंग बदलला का?

६) बदलला असेल तर काय बदल झाला?

**चला वाचनालयात ....**

१) रिकाम्या जागा भरा:

चंद्र हा पृथ्वीचा _ . _ . _ . _ . _ आहे.

चंद्राला पृथ्वीभोवती एक फेरी पूर्ण करायला _ . _ . _ . _ . _ लागतात.

चंद्राला स्वल:भोवती एक फेरी पूर्ण करायला _ . _ . _ . _ . _ लागतात.

**पुस्तकातून शोधा:**

२) पृथ्वीची त्रिज्या -

३) चंद्राची त्रिज्या -

४) सूर्याची त्रिज्या -

५) पृथ्वी चंद्र व सूर्य यांचा आकारानुसार क्रम लावा:

६) पृथ्वीची त्रिज्या चंद्राच्या त्रिज्येच्या किती पट आहे?

७) सूर्याची त्रिज्या चंद्राच्या त्रिज्येच्या किती पट आहे?

८) पृथ्वीपासून चंद्राचे अंतर (चंद्राच्या कक्षेची त्रिज्या):

९) पृथ्वीपासून सूर्याचे अंतर (पृथ्वीच्या कक्षेची त्रिज्या):

१०) पृथ्वीच्या कक्षेची त्रिज्या चंद्राच्या कक्षेच्या त्रिज्येच्या किती पट आहे?

११) कॅलेंडरमधून शोधा:
चंद्र रोज एकाच वेळी उगवतो का?

चंद्र रोज एकाच वेळी मावळतो का?

१२) चूक की बरोबर सांगा; चुकीचे वाक्य बरोबर करून लिहा:

चंद्राला स्वत:चा प्रकाश नसतो.

चंद्राचे वस्तूमान पृथ्वीच्या वस्तूमानापेक्षा जास्त आहे.

चंद्राचा आकार गोळ्यासारखा गोल आहे.

चंद्रावर हरीणे, ससे वगैरे आहेत.

चंद्र चांदीचा बनला आहे.

चंद्रावर वातावरण नाही.

चंद्रावर मुळीच गुरूत्वाकर्षण नाही.

चंद्राचा अर्धा भाग कायम अंधारात असतो आणि उरलेला अर्धा भाग कायम उजेडात असतो.